PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# संत रविदासाचे विज्ञानवादी विचार : एक अभ्यास

**डॉ. गोपाळसिंग बच्छिरे**
सिद्धार्थ महाविद्यालय
**महाराष्ट्र भारत**

**खरात कृष्ण पुंजाराम**
इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
**महाराष्ट्र भारत**

## प्रस्तावना :

जातीव्यवस्था ही भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य असा घटक आहे. वर्णव्यवस्थेतुनच जातीव्यवस्था असा हा प्रवास आहे. भारतीय समाजव्यवस्थेतुन कर्मानुसार प्रथम चार वर्ण उदयास आले.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या चार वर्णामधून व्यवसायावर आधारीत जाती निर्माण झाल्या. जातीत पुन्हा पोट जाती निर्माण झाल्या. या जाती प्रथेना तसेच सामाजिक स्तरांवर वेगवेगळ्या कालखंडात वेगळ्या स्वरुपात न्याय देणारी एक परंपरा असल्याचे दिसुन येते.[१] १४ व्या शतकात मोठ्या प्रमाणात सरजामशांही होती या सरजामशाहीच्या काळातच भक्ती चळवळीच्या उदय मानला जातो. या चळवळी सोबतच अंधश्रद्धा रुढी-परंपरा, कर्मकांड आणि तीव्र जातीयवादावर प्रहार करणारे मानवतेचा व समाजाला एक नवा विज्ञानवादी दृष्टीकोण प्राप्त करु दिला.

## उद्देश :-

१) १४ व्या शतकातील तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करणे.
२) इतिहासातून सुटलेल्या बाबी समोर आणणे.
३) रविदासांचे विचार कसे होते ते अभ्यासणे.
४) रविदासांच्या विचारावरील प्रभाव अभ्यासणे.

समाजातील खालच्या वर्गातील संताना या समाजाने धुतकारण्यांचा प्रयत्न केला तरी समाजाच्या धाडसाने त्यांनी कणखर उभे राहण्यास शक्ती प्राप्त झाली. संपुर्ण जीवन-चरित्रात सत्यं-हीच शक्ती होती. ज्याचा जास्तीत-जास्त अनादर केला जाऊ शकत नव्हता. विरो-पिरो, शंबुक, चार्वाक आणि गौतम बुद्धाच्या काळापासुन चालत येणारी-जनजागृती हीच संघर्षाची प्रेरणा मध्ययुगीन काळात रविदासाच्या वाणीतुन क्रांतीकारी आंदोलन तीव्र स्वरुपात निर्माण झालेली दिसुन येते. रविदासांच्या समकालीन असणा-या संत नामदेव, संत धन्ना, दादु, गुरु, नानक यांनीही समाज सुधारण्याचे कार्य केले आहे.

मध्ययुगीन काळात मात्र जातीव्यवस्थेचे स्वरुप हे तीव्र होते. यातच ती वर्णव्यवस्थेवर आधारीत जात व्यवस्था होती. त्यातच पोट जाती होता. प्रत्येक जातीला स्वत:चे एक लाभ नेमुन दिले. त्याशिवाय इतर कोणतेही लाभ ती जात करु शकत नाही. एक-दुस-या जातीची लग्न संबंध प्रस्थापीत करु शकत नाही. जात ही उच्च जातीविषयी तीरस्कार व तिच्च जातीविषयी तुच्छता बाळगण्याचे कारण ठरते. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या Caste in India या आपल्या ग्रंथात जातीचे मानसशास्त्र सांगत असतांना म्हणतात.)[२]

**संत रविदासाचे दोह्यातुन उधृत होणारे वैज्ञानिक दृष्टीकोन रुढी परंपरेला विरोध :**

मध्ययुगीन काळ हा सरजामशाहीचा कालखंड होता. या दुरावस्थेत असलेल्या समाजाला दैव्यदासातुन मुक्त करण्यासाठी भक्ती चळवळीचा उदय झालेला असुन तत्कालीन समाजामध्ये मुस्लीमांचे वर्चस्व होते. अशा परिस्थितीत संत रविदासाचा जन्म झाला. त्यावेळेची परिस्थिती ती धार्मिक, सामाजिक, राजकीय दृष्टीकोनातुन फारच कठीण होती. या परिस्थितीवर मात करुन संत रविदासाने हे समाजप्रबोधन करण्याचे कार्य हाती घेतलेले दिसुन येते.

"जात-पात के फेर मही, उरझी रहई सभ लोग।

मानुषता कू-खात हुई, रविदास जात को रोग।।[३]

जात-जात मे जात है, ज्यो केलनमे पात।

PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

रविदास ना माणूस जुड सके, जो लौजात न जात।।''[४]

संत रविदासाने जी मानवा-मानवाद्वारे चालत आलेली अनिष्ठ रुढी परंपरा होती त्यावर प्रहार करुन प्रत्येक जण कसा स्वाभीमानाने जगेल यासाठी त्यांनी समतेच्या विचाराचा संदेश दिला आहे.

सद्यपरिस्थितीत सामाजिक परिस्थितीचा विचार करत असतांना रविदासाच्या कार्यातून भारतामध्ये नवचेतना निर्माण होण्याची क्षमता आहे. यालाच सामाजिक पुर्नजागरुकता असे म्हणु शकतो. संत रविदासाने समाजातील सामाजिक, धार्मिक, व आर्थिक या सर्व प्रकारच्या समस्याचे समाधान त्यांच्या कार्यातून केलेले आहे.

रविदासाने केलेल्या परिश्रम आणि कार्यामुळे त्यांची स्वत:मधील आंतरिक शक्ती जागी झाली. यामुळे कोणालाही न घाबरता समाजातील धार्मिक आणि अनिष्ठ रुढी-परंपरांना खुलेआम विरोध केलेला यातुन दिसून येतो. या सर्व समस्येचा सामना संत रविदासाने स्वत: केला आहे. हिंदु धर्मातील चार्तुण्यामध्ये शुद्र वर्णमधील असणा-या चमार जातीत त्याचा जन्म झाल्या असल्याकारणानेही त्यांना विविध असहय अशा परिस्थितीना तोंड द्यावे लागले होते त्यांनी सवर्ण वर्गाला उपदेश देत असतांना ते म्हणतात -

रविदास जन्म के कारणे होत ना कोई नीच।
नर को नीच कर डारी है, ओछे कर्म की किच।।[५]

संत रविदास एक अध्यात्मिक संत नसून ते जनतेमध्ये चेतना निर्माण करणारी एक मोठी मशाल होती. सर्व सामान्य जनतेच्या हक्कासाठी लढणारे वाणीचे निर्भीड योद्धा होते. संत रविदास ज्या आंदोलनाला समोर घेऊन जात आहे; त्या आंदोलनाची परंपरा व्यवस्थित समजुन घेतल्याशिवाय रविदास त्या समाजाला न्याय देऊ शकणार नाही.

रविदासाने स्वत:ला उच्च कुळातील अथवा उच्च जातीतील सांगणा-या खोट्या अभिमानाला खंडित करित असतांना म्हणाले की -

ऊचे कुल के कारनै ब्राह्मण कोय न होय।
जऊ जनही ब्रह्म आत्मा रविदास कही ब्राह्मण सोय।।[६]
रविदास ब्राह्मण मत पुजीये जो होय गुण हीन।

पूजो चरण चंडा लके, जो होये गुण परवीन।।[७]

गुरु रविदासांच्या सामाजिक सिद्धांतामध्ये सहिष्णुता स्पष्ट दिसुन येत आहे. कि, जे लोक धार्मिक कर्मकांडाने घेरलेले आहेत. त्यांना ते काही समजले नाही. त्यांच्या वाणीला सत्याच्या मार्गाने बघितल्यास ती जन्मास महत्त्व देत नसुन ती कर्माला महत्त्व देताना दिसुन येत आहे.

संत रविदासजीने जो ब्राह्मण मुर्ख व दुर्गनी आहे अशा व्यक्तीची पुजा करण्यास विरोध केला आहे. जो व्यक्ती जन्माने कोणत्याही जातीतला असो पण त्याचे कर्म श्रेष्ठ आहे तर अशा व्यक्तीची पुजा करण्यास सांगितले आहे.

**अर्थात -** रविदासाने व्यक्तीची ओळख ही जन्माने नसुन ती कर्म व गुणावर अवलंबुन आहे हे यातुन दाखविले आहे.

पराधीनता पाप है, जान लेहु रे मीत।
रविदास दास प्राधीन सौ, कौन करे है प्रित।।
पराधीन कौ दीन क्या पराधिन बेदिन।।
रविदास 'दास' प्राधीन कौ, सबहि समझे हिन।।[८]

रविदास म्हणतात की, जी व्यक्ती पराधीन आहे. तिला स्वतःला धर्मच नाही ती गुलाम असेल तर स्वतंत्र्यपणे वागण्यास तिला काही सोय-सवलत नसते. त्याचे काम तर दुस-यांच्या आज्ञाचे पालन करणेच असते. गुलामांना सर्वजण नीच समजतात. आणि त्याचा निरादर करतात. जर पराधिनता व हीनता याच्यातून सुटका करुन घ्यायची तर स्वाधीनतेचे पुजारी बना.

आणि सर्वप्रकारे स्वतंत्र राहण्याचा नेहमी प्रयत्न करीत रहा। कर्माबरोबरच समता कशी प्रस्थापीत करता येईल की, ज्यामुळे सर्वजण गुण्यागोविदाने जीवन जगतील हे सांगताना रविदास म्हणतात की,

"ऐसा चाहो राज मै, जहाँ मिले सबन को अन्न
छोट-बडो सभ सम बसै, रविदास रहे प्रसन्न।।"[९]

संत रविदासांना अशा राज्याची किंवा भारताची अपेक्षा होती की, जेथे सामाजिक, आर्थिक, राजकीय अशी सर्व समानता राहील आणि सर्व जनतेला अन्न पाणी मिळेल त्यांना उच्च निच असा

भेदभाव नको होता व त्यांनी बेगमपुरा या शहराची कामना केली होती की त्यामध्ये व्यक्तीला कसल्याही प्रकारचे दु:ख नसायला हवे.

संत रविदासाने आपले विचार हे दोह्याच्या किंवा वाणीच्या माध्यमातून गाव पातळीवर मांडून सर्वांना समजावून सांगितले, त्यामुळे त्यांना समाज परिवर्तन घडवून आणण्यास काही प्रमाणात यश आले. या सर्व दोह्यातून आपल्याला रविदासांचा मानवतावादी दृष्टिकोन समोर येतो.

**निष्कर्ष :**

१) मानवतावादी संत मंडळीपैकी रविदास एक मुकुटमणी अथवा शिरोमणी असल्याचे समोर येते.
२) संत रविदासाच्या सामाजिक, धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यातून विज्ञानवादी दृष्टिकोण समोर येतो.
३) संत रविदासाच्या समाजसुधारणेच्या चळवळीतून स्वातंत्र, समता व बंधुतेचा पुरस्कार केलेला आढळून येतो.
४) संत रविदासाच्या साहित्यातून तत्कालीन समाजव्यवस्थेचे स्वरुप लक्षात येते.
५) संत रविदासाने अनिष्ठ रुढी-परंपरा यांना विरोध करुन मानवतावादाचा पुरस्कार केलेला दिसून येतो.
६) संत रविदासांचे समाजसुधारणेच्या कार्यातले योगदान मोलाचे आहे.
७) संत रविदास यांच्या विचारांवर गौतम बुद्ध यांच्या विचाराचा प्रभाव आढळुन येतो.

**सारांश :**

भारतासारख्या बलाढ्य असलेल्या या देशात विविध जातीधर्माचे लोक वास्तव्य करतांना दिसुन येतात. त्याचप्रमाणे धार्मिक विविधता मोठ्या प्रमाणात दिसुन येते. त्यामुळे भारतातील प्रत्येक नागरीक हा आपल्याला धर्माला चिटकून बसलेला दिसुन येतो. याचा परिणाम धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा यासारख्या अनिष्ठ रुढी, परंपरा चालत आहेत. तसेच प्रत्येकाला स्वत:चा धर्म, जात ही इतरांपेक्षा श्रेष्ठ असल्याचे वाटते. यामुळे आज देशात माणूस-माणसपासुन दुरावत चालला आहे. या सर्व कृतीतून पारंपारीक पद्धतीने चालत असलेल्या धार्मिक व्यवस्थेला जणु आजचा समाज खत-पाणी घालून त्याला पुर्नजिवीत करत असल्याचे दिसुन येत आहे.

तत्कालीन संतांनी प्रत्येक धर्मातील अनिष्ठ, रुढी परंपरा याला दूर करण्याचा प्रयत्न केला. मात्र सध्याच्या परिस्थितीत माणसाच्या वर्तनातून परत तीच परिस्थिती उभी राहते की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संत रविदास यांच्या संपुर्ण साहित्यांच्या अभ्यास केल्यास तेव्हा त्याच्या लक्षात आले की, रविदासाच्या लिखाणाद्वारे तत्कालीन समाजामध्ये चालत आलेल्या अनिष्ठ रुढी-परंपरा यांच्यावर प्रहार केलेला दिसुन येतो. वास्तविकता व विज्ञानवाद यावर भर देऊन त्यांनी जातीवादावर आपले मत स्पष्ट केले व आपल्या कार्यातून समतेची व मानवतेची शिकवण समस्त भारतीय समाजाला दिली. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षात आले व ते रविदासाच्या कार्याने प्रभावीत होऊन त्यांनी ''द अनटेचबल'' हा ग्रंथ संत रविदास आणि संत चोखामेळा यांच्या स्मृतीस अर्पण केला आहे व सिख-धर्मातील आदीधर्म धर्म ग्रंथ ''गुरु ग्रंथ साहीबा'' यामध्ये संत रविदासांच्या ४० पदाचा व एका श्लोकाचा उल्लेख धर्मग्रंथात आला आहे.

अशा प्रकारे रविदासाने आपल्या विचाराच्या माध्यममातुन लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता यासारखे मूल्ये मध्ययुगीन काळात रुजवली अनेक संतांनी त्यांच्या मार्गाचा अवलंब केला. त्यामध्ये संत मिराबाई तर रविदासांना आपले गुरु मानीत असे. संत रविदासाच्या या अमूल्य कार्यामुळे त्यांना ''संतो के संत'' ही उपाधी मिळाली आहे.

रविदासांच्या मधूर-वाणी व स्वभावामुळे त्यांनी या कालखंडातील बिकट परिस्थितीला विरोध करुन आपले मत लोकापर्यंत पोहोचवले व त्यांना या कार्यात यश मिळाले. यातुन रविदासाचे अद्वितीय असे व्यक्तीमत्त्व समोर येते.

''यामुळे, आचार्य रजनीश आशो यांनी संत रविदासांना ''ध्रुवतारा'' आणि त्याच्या वाणीला 'आग का फुल' असे म्हटले आहे. या प्रकारचे समाज परिवर्तन संत-रविदासाने आपल्या विचारातून व कार्यातून त्यांनी घडवून आणले. या परिवर्तनाचे पाळे-मुळे त्याच्या लेखनामध्ये होती. समाजाने व इतिहासाने दुर्लक्ष केलेल्या या संत रविदासांच्या कार्य व वाणीतुन विज्ञानवादी दृष्टिकोन समोर येतो.

## सन्दर्भ ग्रंथ :–

१) मनुस्मृती - अध्याय पहिला श्लोक - ३१.

२) डॉ. आंबेडकर, २०१२, भारतातील जाती, त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास, प्रबुद्ध भारत प्रकाशन, नागपुर.

३) सिंह, शा.प., २००५, संत रोहिदासांची मूळ विचारधारा, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पान क्र. ५३.

४) भगोरे, पुरु, २०१५, सामाजिक क्रांन्ति के अगदुत : संत रविदास (रोहीदास), साधना पब्लिकेशन, परभणी, पान नं. ८५.

५) उ.नि., पान क्र. ८६.

६) चांदेकर चं., २०१७, सामाजिक क्रांतीचे प्रणेते, संत, शिरोमणी गुरु रविदास, प्रबुद्ध भारत पुस्तकालय, नागपुर, पान क्र. ३०.

७) सिंह स., २०१४, गुरु रविदास की हत्या के प्रामाणिक दस्ताऐवज, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पान क्र. ८३.

८) उ.नि., पान क्र. ७३.

९) बौद्ध, स्व.च., २००८, बौद्ध विरासत के पुरोधा गुरु रैदास, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पान क्र. ५७.